**सी.एन.आर.क्र. एम.एच.डी.एच.०४०००३४९२०१६**

**<u>नि.दि.मु.क्र. २४/२०१६ मधील निशाणी ५० वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींतर्फे कागदपत्रे दाखल करण्यासाठी परवानगी मिळावी याकरीता केलेला आहे. अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच, दोन्ही बाजूकडील म्हणणे ऐकले.

०२. प्रतिवादींतर्फे कथन थोडक्यात असे की, प्रस्तुत प्रकरण वादीच्या उलटतपासावर आहे. मात्र, प्रतिवादी आज रोजी काही महत्वाचे दस्तऐवज म्हणजेच खरेदीपत्राची सहीशिक्याची नक्कल दाखल करीत आहेत. सबब, प्रतिवादींतर्फे विनंती करण्यात आली आहे की, सदर दस्तऐवज दाखल करण्यास परवानगी मिळावी व त्यास निशाणी लावण्यात येवुन पुराव्याकामी वाचला जावा. प्रस्तुत अर्जास वादींतर्फे तिव्र विरोध करण्यात आला आहे. वादींचे कथन थोडक्यात असे की, प्रस्तुत प्रकरण जुने असुन सुनावणी करण्याकरीता नेमण्यात आलेले आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज हा हेतुपुरस्सररित्या प्रकरण लांबवण्याकरीता व गुंतागुंत निर्माण करण्याकरीता दाखल केलेला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अथवा मंजुर झाल्यास जास्तीत जास्त खर्च बसविण्यात यावा.

०३. प्रस्तुत अर्जासोबतच्या यादीमध्ये अ. क्र. १ कडे नमुद प्रतिवादी हजर करु पाहत असलेला दस्तऐवज म्हणजेच खरेदीपत्राची

सहीशिक्याची नक्कल पाहता, सदर दस्तऐवज प्रस्तुत कामी संबंध आहे असे सकृत दर्शनी दिसून येते. तसेच, सदर खरेदीपत्राची सहीशिक्याची नक्कल हजर करण्यास परवानगी दिल्यास या न्यायालयाला न्यायदानाचे कामी मदतच होणारी आहे. प्रस्तुतचे कामी वादीतर्फे साक्षीदार क्र. १ याचा उलटतपास अदयाप पुर्ण झालेला नाही. तसेच, प्रतिवादी यांचेतर्फे पुरावा, काही असल्यास, अदयाप बाकी आहे. विषयांकीत खरेदीपत्राच्या अनुषंगाने पुरावा देण्याची व त्यावर युक्तीवाद करण्याची संधी वादींना पुढे प्राप्त होणारी आहे. त्याकारणे, न्यायाचे कारणास्तव प्रतिवादींना उपरोक्त दस्तऐवज हजर करण्याची परवानगी दिली गेल्यास वादींचे कोणतेही नुकसान होताना दिसून येत नाही. वरील कारणांकरीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादींना उपरोक्त दस्तऐवज हजर करण्याची परवानगी न्यायोचित होणारे आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :–

## – आदेश –

प्रस्तुतचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादींना उपरोक्त दस्तऐवज अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.01.31 17:19:13 +0530

स्थळ : दोंडाईचा
दिनांक : ३१/०१/२०२५

आदित्य घ. नाईक
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), दोंडाईचा

## प्रमाणपत्र

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | जी. एस. अहिरे. |
| न्यायालयाचे नांव | - | दिवाणी न्यायालय क.स्तर, दोंडाईचा. |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | - | ३१.०१.२०२५. |

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)